# साय-फाय करंडकमध्ये 'आमचे आम्ही'ची बाजी

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) - 'क्विक हिल फाऊंडेशन'तर्फे आणि महाराष्ट्र सायबर सेल व थिएटर अ‍ॅकॅडमी यांच्या सहयोगाने आयोजित साय-फाय करंडक 'आमचे आम्ही' या पुण्यातील नाट्य संस्थेने जिंकला. 'आय अ‍ॅग्री' या एकांकिकेच्या सादरीकरणातून कलाकारांनी करंडक पटकावला. 'नाट्यसंस्कार, पुणे' या संस्थेला 'एफ ५७' या एकांकिकेसाठी दुसरा तर मुंबईच्या 'स्वप्नपूर्ती क्रिएशन्स'ला 'कम्युनिकेशन एरर' या एकांकिकेसाठी तिसरा क्रमांक मिळाला.

ही स्पर्धा पुण्यातील 'सकळ ललित कलाघर' येथे रंगली. सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजिलेल्या या अनोख्या एकांकिका स्पर्धेस उदंड प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातून शंभरपेक्षा जास्त प्रवेशिका आल्या होत्या. प्रसाद पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे, मुंबई, संभाजीनगर, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या प्रादेशिक केंद्रांमध्ये चाचणी घेऊन अंतिम फेरीसाठी नऊ संघ निवडण्यात आले होते. साय-फाय करंडकाच्या अंतिम फेरीत विचारप्रवर्तक आणि आजच्या काळाच्या एकांकिका सादर झाल्या. आजच्या डिजिटल प्रेरित जीवनशैलीवर त्यातून प्रकाश टाकण्यात आला.

अंतिम फेरीमध्ये नऊ संघांतून 'आमचे आम्ही' संस्थेचे पहिला क्रमांक मिळवला. प्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुख आणि जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.